**नाटक**

# काळ्या बाया मातीत माती बनून जातात

## योगिनी राऊळ

*काळ्या बाया काळ्या मातीत निंदतात*
*काळ्या बाया काळ्या मातीत राबतात*
*काळ्या बाया काळ्या मातीत माती बनून जातात...*

या श्रीकांत देशमुख यांच्या कवितांच्या ओळींसोबत 'नली' हा एकपात्री प्रयोग संपतो आणि प्रेक्षक कित्येक क्षण स्तब्धच बसून राहतात. टाळ्या वाजवायचंही भान त्यांना राहत नाही. थोड्या वेळाने टाळ्या सुरू होतात आणि लोकांचं डोळे पुसणंही. केवळ एक तासाचा हा एकपात्री प्रयोग आपल्याला खानदेशी बोलीच्या गोड नादात अडकवून खानदेशात घेऊन जातो खरा, पण 'नली' ही केवळ खानदेशातल्या शेतकरी बाईची गोष्ट राहत नाही. भारतातल्या असंख्य गाव-खेड्यातल्या असंख्य नली आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात, ज्या काळ्या मातीत निंदतात, राबतात आणि एक दिवस माती होऊन जातात. 'नली- निरपेक्ष प्रेमाची गोष्ट' ही त्या सगळ्याजणींचीच गोष्ट.

जळगावची 'परिवर्तन' संस्था गेली आठ वर्षे जळगाव आणि उर्वरित महाराष्ट्रात नाटके, अभिवचन याद्वारे स्त्री-प्रश्नांचा, इतर सामाजिक प्रश्नांचा धांडोळा घेते आहे. 'परिवर्तन' या नावावरूनच लक्षात यावं की समाजात काही बदल घडावा यासाठी संस्था प्रयत्नशील आहे आणि त्यासाठी संस्थेने नाटक, अभिवाचन, कथाकथन अशा साहित्य-विषयक सांस्कृतिक कार्यक्रमांचा आधार घ्यायचं ठरवलं आहे. 'नली' हा असाच एक प्रयत्न. मात्र त्याला प्रयत्न न म्हणता 'यशस्वी प्रयत्न' म्हणावं, इतका हा नाट्यप्रयोग फर्मास जमून आला आहे.

एका छोट्याशा खेड्यात एकाच शाळेत शिकणारे बाळू, नाम्या, नली असे सगळे शाळासोबती. वर्गात खूप मित्र-मैत्रिणी असल्या तरी नली आणि तिचं वेळी-अवेळी खळाळून हसणं याची बाळूला बालसुलभ भूल पडली आहे. इतकी की नली हसली की तिच्या रिबिनीपण हसतात, असं बाळूला वाटतं. वयाच्या दहाव्या-अकराव्या वर्षापर्यंत एकत्र वावरणारी ही मुलं पुढे माध्यमिक शाळेच्या निमित्ताने एकमेकांपासून दुरावतात. नली चौथीत नापास होते आणि शाळा सोडून शेतीच्या कामाला लागते. बाकीच्या मुला-मुलींचीही हळूहळू तीच गत होते आणि एकटा बाळू माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी असं करत-करत जिल्हाधिकारी होतो. अधिकारी बनून बाळू गावी परत येतो, तोपर्यंत नलीचं लग्न

लेखिका मुंबईस्थित स्त्रीमुक्ती संघटनेच्या प्रेरक ललकारी मासिकाच्या संपादक मंडळ सदस्य आहेत.
ईमेल- yogini.raul@gmail .com

झालेलं असतं. बाळूला नलीविषयी जे वाटत असतं, ते नक्की प्रेम असतं का? नलीच्याही तसंच काही मनात असतं का? याची उत्तरं आपल्याला नाटकात मिळत नाहीत, किंबहुना याच्या उत्तरांसाठी हे नाटक नाहीच.

बाळू-नलीची बालपणाची आणि पुढे तारुण्यसुलभ, निरपेक्ष मैत्री दाखवता दाखवता हर्षल पाटील हा तरुण हरहुन्नरी कलाकार आपल्याला भारतातल्या खेड्यात अलगद फिरवून आणतो. गावातल्या श्रीमंत-वजनदार लोकांची अरेरावी, त्यांची शिक्षणाविषयीची उदासीनता, जातीजातीतले सूक्ष्म भेद, कुमारवयाच्या उंबरठ्यावरचं अवघडलेपण, बाळूच्या आईसारख्या एखाद्या आईला पटलेलं शिक्षणाचं महत्त्व आणि या सगळ्यामुळे बाळूची वाढलेली समज हे सगळं आपल्यासमोर एका तासात उलगडत जातं. नाटक एकपात्री असल्यामुळे यातल्या बारा विविध व्यक्तिरेखा एकटा हर्षलच करतो आणि त्यासाठी तो जास्तीची प्रॉपर्टी म्हणून पंचा, ओढणी, टोपी, काठी असं काहीही वापरत नाही. केवळ चेहरा, आवाज आणि हावभाव यातून हर्षल आपल्यासमोर जे सादर करतो, ते शब्दांत पकडणं कठीण आहे. यामागे श्रीकांत देशमुख यांची सशक्त कथा आणि योगेश पाटील या आणखी एका युवा कलाकाराचं समजूतदार दिग्दर्शन या जमेच्या बाजू आहेत. मुळात श्रीकांत देशमुख यांनी ही कथा लिहिली तेव्हा त्याचं नाटक होईल, असं त्यांना वाटलंच नव्हतं. परिवर्तन संस्थेचे शंभू पाटील यांना कथेत नाटक दिसलं आणि योगेश पाटील याने ते समर्थपणे रंगमंचावर उभं केलं. विषयाच्या वेगळेपणापासून ते पार्श्वसंगीताच्या चपखल वापरापर्यंत सगळ्याच गोष्टींना शंभरपैकी शंभर गुण द्यावेत, असा देखणा प्रयोग आपल्यासमोर नलीच्या रूपाने सादर होतो. नाटक संपल्यानंतरही नलीचं खळाळून हसणं आपल्या कानात गुंजत राहतं.

नाटकाच्या शेवटी जिल्हाधिकारी बाळासाहेब (बाळू) पेपरमध्ये बातमी वाचतो की नलीने आत्महत्या केलीय आणि सरकारने तिच्या वारसांना काही लाखांची मदत जाहीर केलीय. नलीची गोष्ट संपते, पण प्रेक्षकांच्या डोक्यातले प्रश्न संपत नाहीत. आज एकविसाव्या शतकातही मुलींनी शिकावं की शिकू नये? शिकायचं असेल तर कितवीपर्यंत? लग्न कितव्या वर्षी, कोणाशी करावं? गावात-शाळेत कोणाशी बोलावं? कोणकोणते अन्याय निमूट सहन करावेत? यातल्या एकाही प्रश्नाचं आपल्याकडे ठोस उत्तर नाही. सावित्रीबाई आणि ज्योतीराव फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली त्याला यावर्षी बरोबर १७० वर्षे झाली, तरीही आपल्या महाराष्ट्रात मुलींच्या शिक्षणाची ही स्थिती. मग देशातल्या इतर खेड्यांत मुली नक्की कशाला तोंड देत असतील?

पुन्हा हा प्रश्न फक्त मुलींच्या कुचंबणेशी संलग्न नाही. बाळूला, बाळूच्या आईला शिक्षणाचं महत्त्व कळलेलं आहे, पण खेड्यापाड्यात माध्यमिक, उच्च-माध्यमिक शिक्षणाच्या सोयी नाहीत. त्यासाठी अजूनही बाळूसारख्या मुलांना गावाबाहेर, शहरात, होस्टेलवर, नातेवाईकाकडे, परिचिताकडे राहून शिकावं लागतं आहे. म्हणजे लोकांना शिक्षण हवं आहे, पण शिक्षणाच्या पुरेशा सोयी अजूनही नाहीत. बाळू शिकला तरी उघडपणे मनातली- नलीशी लग्न करण्याची- इच्छा सांगण्याची हिंमत करत नाही. ही सामाजिक दरी किंवा दहशत आहेच, पण त्यापलीकडे प्रश्न असाही आहे की आपल्या मुलांना मिळणारे शिक्षण त्यांना निर्भय बनवतंय का? आपल्या शिक्षणातून समानतेची, स्वातंत्र्याची मूल्ये पुरेशा प्रमाणात मुलांच्या कोवळ्या मनात रुजताहेत का? आणि ती तशी रुजत नसतील तर समाज केवळ साक्षर होतो आहे, शिक्षित नाही.

तिसरा महत्त्वाचा विषय नाटक मांडतं तो म्हणजे मुलामुलींची लग्नं करून देताना आपण अजूनही कसला विचार करतो? केवळ जातीचा, वयाचा आणि कुटुंबाच्या इभ्रतीचा. कथा-कादंबऱ्यांत, सिनेमा-नाटकात लग्न हे दोन जीवांचं मिलन, दोन कुटुंबांचं एकत्र येणं, आपल्या विचारांना शोभेसा जोडीदार निवडणं वगैरे वगैरे सगळं बघूनही परत ह्या भलत्याच जगातल्या गोष्टी असाव्या

तसं आपण लग्नाच्या बाबतीत जातीवरच घसरतो. नलीचं लग्न अशा माणसासोबत लावलं जातं, जो कोणत्याही बाबतीत नलीला शोभणारा नसतो, पण केवळ जातीतला म्हणून नलीच्या गळ्यात बांधला जातो. लहानपणापासून मुलींना कष्ट करायला शिकवायचे ते कशासाठी तर आपल्याला न शोभणाऱ्या नवऱ्याच्याही घरात त्यांनी निमूटपणे राबत राहावं यासाठी. सासरच्या लोकांसाठी, नवऱ्यासाठी आणि मुलं झाल्यावर मुलांसाठीसुद्धा बाईने फक्त राबायचं, न तिला निर्णयाचे अधिकार, न तिला निर्णय नाकारण्याचे अधिकार.

सरतेशेवटी नाटक जे मांडतं, तो तर आपल्या समाजाच्या, राजकारणाच्या दांभिकतेचा कळस आहे. नली वारल्यावर नलीच्या वारसांना काही लाखांची मदत जाहीर होते. म्हणजे एकीकडे शिक्षणाच्या सोयी नाहीत, पर्यायी रोजगार उपलब्ध नाही, मुलांना निर्णयाचं स्वातंत्र्य नाही, शेतीमध्ये पुरेसं उत्पन्न नाही आणि सरकार फक्त आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देऊन सगळ्याचीच जबाबदारी झटकू पाहत आहे. शेतीत मूलभूत सुधारणांची, बदलांची गरज आहे, पर्यायी रोजगारासाठी तांत्रिक शिक्षणाच्या सोयी वाढवण्याची गरज आहे, मुलींच्या शिक्षणाचं महत्त्व लोकांना पटवून द्यायची गरज आहे आणि सगळ्यात महात्त्वाचे म्हणजे मुलींचा अनुत्पादक कामात जाणारा वेळ हे राष्ट्रीय मनुष्यबळाचं नुकसान आहे, याची कोणतीच जाणीव कोणत्याच पक्षाच्या सरकारला नाही. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' हे वाक्य फक्त निबंधात लिहिण्यापुरतं आपण चकचकीत करून ठेवलं आहे. मुळात स्त्रियांचा उद्धार हा राष्ट्रीय प्रगतीशी, सकल राष्ट्रीय उत्पन्नाशी निगडित आहे, याची जाणीव तरी आपल्याला आहे का? स्त्रिया घरात बसणं, त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नात सहभाग नसणं याचा अर्थ पन्नास टक्के लोकसंख्या अनुत्पादित असणं आणि त्यावरचा उपाय हा मेलेल्यांच्या वारसांना मदत असा कधीच होऊ शकत नाही. जिल्हाधिकारी झालेल्या बाळूला हे सगळं कळतं आहे, पण तोपर्यंत या व्यवस्थेने त्याच्या बालमैत्रिणीचा बळी घेतलेला आहे. 'आत्महत्या हे कोणत्याच समस्येचं उत्तर नाही' हे बाळूसारखंच आपल्यालाही माहीत आहे, पण मग या समस्यांचं उत्तर काय? ही व्यवस्था आमूलाग्र बदलणं बाळूसारख्या शिक्षित अधिकाऱ्यांना खरंच शक्य आहे का?

नाटक जाता-जाता अनेक छोट्या-छोट्या गोष्टींना ओझरता स्पर्श करतं. मारुतीच्या देवळात मुलींना यायला मज्जाव करणं, खेड्याचं नगर होताना झाडांचं गायब होणं, देवांचं स्थान केवळ प्रतीकात्मक होत जाणं, मास्तर म्हणजे आदर्श ही संकल्पना हळूहळू गायब होणं आणि गावातल्या मुली काळ्या मातीत राबत असताना तरुण मुलांनी मात्र रिकाम्या चकाट्या पिटणं, असे सगळे बारीक-बारीक तपशील या एका तासाच्या नाटकात येतात. प्रत्येकावर नाटक भाष्य करत नाही, पण विचारी प्रेक्षकांच्या डोक्यात एक-एक किडा मात्र नक्की सोडत जातं आणि आपल्या खेड्यातले सगळे प्रश्न एकमेकांत गुंतलेले आहेत; एक प्रश्न सोडवायला जावं तर इतर प्रश्न अंगावर येतील, याची नाटककाराची प्रगल्भ जाण अधोरेखित करतं.

नाटकाची सर्वात भावणारी गोष्ट कोणती असेल तर स्त्रियांच्या प्रश्नांना चहू बाजूने भिडणाऱ्या नाटकाची संहिता, दिग्दर्शन आणि अभिनय तीनही पुरुषच करतात. बायकांना बोलण्याची मुभा नव्हती तेव्हा पुरुषांनी बायकांच्या वतीने बोलणं गरजेचं होतं. मात्र बायका अनेक बाबतीत बोलत्या झाल्यावरही पुरुषांना बायकांसाठी बोलावसं वाटतं आहे, स्त्री-सक्षमीकरणाचा खरा अर्थ पुरुष समजून घेऊ इच्छित आहेत, हे अतिशय स्वागतार्ह आहे. या नाटकाचे जास्तीत जास्त प्रयोग तरुण-तरुणींसमोर व्हायला हवेत, प्रयोगाच्या निमित्ताने नाटकाच्या टीमशी संवाद साधायला हवा, नकाराचा, लग्नाचा आणि शिक्षणाचा खरा अर्थ समजून घ्यायला हवा. हे करण्यासाठी 'परिवर्तन' तुमच्यापर्यंत आलं आहे, तुम्हीही त्यांना साथ द्या! ●